
# तीत हा नव्या मंडळयां ची विभागीय देखरेख करणारा होता

नव्या मंडळयांवर नव्या पुढ्यायांची नेमणूक करण्यासाठी विभागवार देखरेख ठेवणायांची तरतूद करा

मुलांना शिकवणायांनी R1b हा अभ्यास वाचावा.

1. **प्रार्थना व देवाच्या वचनाच्याद्वारे आपल्या अंत:करणाची तयारी करा.**



विभागीय देखरेख ठेवणायांचे काम काय आहे हे समजण्यासाठी कृपा करुन **पौलाने तीताला लिहिलेले पत्र वाचा.**

- आम्हांला विभागीय देखरेख ठेवणायांची गरज का आहे? *(देखरेख करणायांना 'बिशप्स' किंवा अन्य काही उपयुक्त संघटना असेही म्हणतात).*

*(उत्तर : तीताने क्रेतमध्ये राहून नव्या मेंढपाळ पाळकांची नेमणूक केली आणि त्यांना तयार केले. नव्या मंडळीला हे काम करण्याकरीता कोणाची तरी आवश्यकता असते. नव्या मंडळया हे काम स्वत:चे स्वत: करण्या एवढया परिपक्व झालेल्या नसतात. तीत व तीमथ्य ह्यांना लिहिलेल्या आपल्या पत्रांमध्ये पौलाने समन्वयक आणि मेंढपाळ पाळक यांचा शील स्वभाव आणि कर्तव्ये स्पष्ट केली आहेत. अधिक परिपक्व लोक, जसे प्रे.कृ. 13:1-3 मधील अंत्युखिया, त्यांचे स्वत:चे पुढारी नेमतात).*

**पाहा तीत 1:1-3 मध्ये:**

- येशू ख्रिस्ताच्या संदर्भात पौलाचे स्थान काय होते.
- देवाने पौलावर कोणती कामगिरी सोपवली.

**पाहा तीत 1:4-5**

- तीताचे पौलाशी नाते.
- पौलाने तीताला क्रेतामध्ये का ठेवले.
- तीत हा नवा विभागीय समन्वयक होता, त्याला क्रेतमधील नवीन नव्या मंडळयांसाठी काय करण्यास पौलाने सांगितले?

**पाहा 2 करिंथ 2:12-13 मध्ये** पौलाच्या दृष्टीने तीताच्या सहभागितेचे मूल्य काय होते. तीत त्याचा 'आध्यात्मिक पुत्र' आहे.

**पाहा 2 करिंथ 7:5-7**

- इतर लोकांना तीताविषयी काय वाटे.
- तीत बरोबर असताना काय सहन करण्याची पौलाची तयारी आहे?
- नवीन मेंढपाळ (वडीलजन) होण्यासाठी आवश्यक गोष्टी तीत 1:6-9 मध्ये पाहा.
- वडीलांचे कुटुंब कसे असले पाहिजे.
- वडीलांचा शीलस्वभाव कसा असावा.

**पाहा तीत 1:10-16** मध्ये हे वडीलजन कोणत्या प्रकारच्या समस्या सोडवण्यास सक्षम आहेत.

काही गोष्टी अपुया राहिल्या असल्याचे पौलाने तीताला सांगितले (तीत 1:5).

**पाहा तीत 2:1-10 मध्ये** कोणत्या गोष्टी सुरळीत करण्याची आवश्यकता आहे.

- वृद्ध माणसांना तीतने काय करण्याची सूचना द्यायची होती?
- वृद्ध स्त्रिया?
- तरुण माणसे?
- गुलाम दास?
- (रोमन कायद्यानुसार गुलाम दासांनी आपल्या धन्यांची सेवा करायची असते, त्यांना 'स्वतंत्र' म्हटले जाते).

**पाहा तीत 2:15** मध्ये विभागीय समन्वयकाने ह्या गोष्टींवर किती ठामपणे भर द्यावा.

**पाहा फिलिप्पै 2:19-30** मध्ये फिलिप्पै विभागातील सेवा करणाया दोन समन्वयकांची नावे.

- हे दोघे समन्वयक कोणत्या प्रकारची माणसे होती?
- पौलासोबत त्यांनी मंडळयांसाठी काय केले?
- पौलला त्यांच्याबद्दल किती विश्वास होता?

**2. तुमच्या सहकायांशी चर्चा करुन इतर मंडळयांमधील विभागीय समन्वयाची योजना आखा.**

योग्य गोष्टी करण्यासाठी योग्य लोकांची नेमणूक करण्यासाठी देवाने सूज्ञता द्यावी याकराती **प्रार्थना करा.**

- तुमच्या मंडळयांवर कोण देखरेख ठेवणार हे एकमताने ठरवा. हा देखरेख करणारा मंडळी सुरु करणारा 'प्रेषित' असेल किंवा त्याबद्दल खरीखुरी आस्था दाखवणारा पुढारी असेल. नव्या करारामध्ये असे प्रेषित नव्या मंडळयांची सुरुवात करण्यासाठी अन्य प्रदेशातून आले होते.
- नवीन मेंढपाळ पाळकांना मार्गदर्शन करण्यास समन्वयक सक्षम आहे का? नसेल तर, पौलाने जशी तीत व तीमथ्य ह्यांची नावे सुचवली, तशी त्यांनी इतर समन्वयकांची नावे सुचवावीत.

  नवीन समन्वयकांनी काय केले पाहिजे ते त्यांना दाखवा.
- नवीन मंडळयांना भेटा प्रोत्साहन द्या आणि पत्र लिहा, पौलाने असेच केले.
- सोबत काही शिकाऊ उमेदवारांना घ्या ते त्यांच्याकडून इतरांपर्यन्त सूचना कशा पोचवायच्या ते शिकतील (2 तीमथ्य 2:2).
- हे वडील ज्या मंडळयांत आहेत त्या नव्या करारात सांगितलेल्या गोष्टी करायला लागेपर्यन्त त्यांना पाळक मेंढपाळांची मार्गदर्शन करण्याची व्यवस्था करा.

**मंडळी जोवर लहान आहे.** तोवर 'प्रेषित' स्वत:च विभागीय समन्वयक म्हणून काम करतील (प्रे.कृ. 14:21-23), 'प्रेषित' अन्यत्र जाऊन सेवा करण्यास तयार होतो तेव्हा त्या भागात देवाच्या कार्याचा समन्वय साधण्यासाठी आपल्या शिकाऊ उमेदवाराला त्याने अधिकार दिले पाहिजेत (फिलिप्पै, 2:19-24).

- नवीन पेंढपाळ पाळकांना मार्गदर्शन करणाया सर्व मेंढपाळ पाळकांना पौल-तिमथी अभ्यास किंवा अन्य योग्य अभ्यास साहित्य मिळाले असल्याची खात्री करुन घ्या.
- मंडळयांना त्यांच्या कार्याचा समन्वय साधाण्यास साहाय्य करा.
- विश्वासूपणे सेवा करणाया उमेदवारांना जाहिररीत्या पाठिंबा देण्याची योजना आखा.
- त्यांच्यावर हात ठेवून सर्वांसमक्ष त्यांना आधिकार सोपवून द्या (2 तीमथ्य 1:6, 1 तीमथ्य 4:14).
- त्यांचा आदर सन्मान करण्याच्या सूचना मंडळयांना द्या (1 करिंथ 16:10-11, फिलिप्पै 2:29).
- पाप करणाया लोकांना अधिकार देण्याचे टाळा (1 तीमथ्य 5:22).

  'प्रेषितांनी' विभागीय समन्वयकांना पुढील गोष्टी कशा करायच्या हे दाखवण्याची व्यवस्था करा...
- नवीन मेंढपाळ पाळकांशी बोलून त्यांच्या मंडळयांच्या गरजा समजून घेणे.

- त्यांच्या मंडळ्यांचे लोक काय करीत आहेत आणि त्यांनी काय करण्यास सुरुवात केली पाहिजे ते पाहा.
- तीत 1:6-9 मध्ये सांगितल्याप्रमाणे वडीलजनांसाठीच्या आवश्यक गोष्टी करण्यास सुरुवात करणाऱ्या लोकांचा शोध घ्या.

**3. तुमच्या सहकाऱ्यांशी चर्चा करुन येणाऱ्या उपासना सभेविषयी योजना आखा**

2 करिंथ 2:12-13 आणि 7:5-7 मधून तीताविषयी सांगा.

फिलिप्पै 2:19-30 मधून तीमथ्य व एपप्रदीत ह्यांच्या विषयी सांगा. प्रभू येशू आपल्या सेवकांना विश्वासू व उपयुक्त अशा नम्र शिकाऊ समन्वकांच्या द्वारे कसा आशीर्वाद देतो ते स्पष्ट करा.

**स्पष्ट करा:**

- विभागीय समन्वयकांची गरज आणि ते काय करतात, भाग 1 व 2 मधून.
- 'प्रेषित' काय करतात, भाग 2 मधून.

मुलांनी तयारी केलेले कार्यक्रम प्रौढांसमोर सादर करावेत.

विश्वासणाऱ्यांनी आशीर्वाद, सत्कार्य आणि त्यांना माहित असणाऱ्या समन्वयकाचा शीलस्वभाव याबद्दल साक्ष द्यावी.

प्रभुभोजनाची ओळख करुन देण्यासाठी गणना 9:1-5 वाचा. देवाच्या लोकांनी रानात वल्हांडण सणाचे कोकरु खाल्ले. यावरुन देवाने दाराच्या कापळपट्टीवर कोकऱ्याचे रक्त असणाऱ्या घरांमधील प्रथम पुत्र मारला नाही आणि त्यांना इजिप्तच्या गुलामगिरीतून बाहेर काढले याची आठवण केली, हे स्पष्ट करा.

दोन वा तीन जणांचे लहान गट करुन एकमेकांसाठी प्रार्थना करुन प्रोत्साहन द्या आणि योजना आखा

**वाचा मार्क** 10:42-45 आणि वचन 45 पाठ करा.

Copyright 2004 © by Paul-Timothy. May be freely copied. Download from www.Paul-Timothy.net